From the house of
HOME CABLE
HOME NET

मराठी
# होम टाइम्स
साप्ताहिक शनिवार
FREE COPY

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 32 | Saturday, 4th Nov 2023 to 10th Nov 2023 | Price ~~Rs 3~~/-

www.hometimes.in www.facebook.com/hometimes.in www.twitter.com/hometimes_news hometimes.in write2us@hometimes.in

# मुंबईकरांनो फटाके फोडा, पण जरा दमाने...

## पालकमंत्री केसरकरांचे मुंबईकरांना आवाहन

■ **होम टाइम्स टीम**

मुंबईत सध्या प्रदूषित हवेने कहर केल्याचे दिसतेय. ही हवा मुंबईकरांना आजारी पाडू लागलीय. अनेकांना श्वसनाचे आजार झालेत. अशातच फटाक्यांच्या अतिशबाजीचा सण म्हणून ओळखला जाणारा दिवाळीचा सण काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे फटाके वाजवणे आणि विक्रीकरण्यावर बंदी येईल असे वाटत असतानाच पालकमंत्र्यांनी फटाक्यांवर बंदी न घालता फार बॉर्नवर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

बांधकामे आणि वाहनांच्या वाढत्या संख्येने मुंबईत मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढले असतानाच मुंबईकरांसमोर फटाक्यांची आतिषबाजी करणारा अर्थात दिवाळीचा सण येऊन ठेपला आहे. या सणामुळे बाजारपेठांमध्येही फटाक्यांची विक्री सुरू झाली आहे. यातच प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी महापालिकेकडून अनेक मार्गदर्शक सूचना जारी केल्या जात आहेत तर दुसरीकडे बुधवारी पालकमंत्री दीपक केसरकर यांनीही पत्रकार परिषद घेऊन प्रदूषण कमी करणाऱ्या सहा तंत्रांची माहिती दिली आहे.



ज्यामुळे वायू प्रदूषण नियंत्रणात ठेवता येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच मुंबईच्या रस्त्यावर धावणाऱ्या बेस्टच्या ३५० बसेसमध्ये एअर फिल्टर बसवण्यात येणार आहे.

याची माहितीही केसरकर यांनी दिली. यासोबतच १० ठिकाणी व्हर्च्युअल चिमणीही बसवण्यात येणार आहेत. हवा शुद्ध करण्यास मदत करणारे खास पथदिवेही बसविण्यात येणार आहेत. दिवाळीच्या धर्तीवर मुंबईत विविध भागात मोठ्या प्रमाणात फटाके फोडले जातात. मुंबईकरांच्या आरोग्याची चिंता व्यक्त करून यंदा मात्र फटाक्यांवर बंदी घालण्याऐवजी नागरिकांनीच कमी फटाके फोडावेत असे आवाहन करण्यात आले आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी पेटविल्या जाणाऱ्या शेकोटीवर मात्र प्रशासनाकडून बंदी घालण्यात आली आहे.

# दंड न भरल्यास चढावी लागणार कोर्टाची पायरी

■ **होम टाइम्स टीम**

**वाहतूक विभागाकडून वाहनांकडून आकारण्यात येणारा दंड वसूल करण्याची नवी मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेनुसार दंड न भरल्यास वाहनचालकांना न्यायालयात हजर राहावे लागणार आहे. असा इशारा देत वाहतूक विभागाने चालकांना १५ दिवसांचा अल्टिमेटमही दिला आहे. त्यामुळे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांना कोर्टाची पायरी चढण्याचे टाळायचे असेल तर नियमांचे पालन करावे लागणार आहे.**

## मुंबई वाहतूक विभागाने दिला १०,५०० वाहनचालकांना अल्टिमेटम

अनेकदा वाहनचालकांकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे वाहतूक विभागाकडून या वाहनांना दंड आकारण्यात येतो. मात्र अनेक वेळा वाहतूक विभागाला ही रक्कम वसूल करण्यात अपयश येते. ही बाब लक्षात घेऊन आता मुंबई वाहतूक विभागाकडून दंड वसूल करण्याची नवी मोहीम सुरू करण्यात आली आहे. आता कोणत्याही वाहनावर २० हजार रुपयांपेक्षा जास्त दंडाची थकबाकी असल्यास अशा चालकांना १५ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात येणार आहे. थकबाकीचा दंड १५ दिवसांत वाहनचालकांनी न भरल्यास अशा वाहनचालकांना कोर्टात हजर करण्यात येणार आहे. याबाबत वाहतूक विभागाचे सहायक पोलिस आयुक्त प्रवीण पडवळ यांनी सांगितले की, २० हजारांपेक्षा जास्त दंड असलेल्या सुमारे १० हजार ५०० वाहनचालकांना १५ दिवसांचा हा अल्टिमेटम देण्यात आला असून, त्यांना १५ दिवसांत थकित दंड भरण्यास सांगण्यात आले आहे. १५ दिवसांनंतर या चालकांना कोर्टात हजर करण्यात येणार आहे. मुलुंड वाहतूक विभागाने होम टाइम्सला दिलेल्या माहितीनुसार, या संदर्भात २४५ वाहनांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यानंतर अनेक वाहनचालकांनी थकीत दंड भरण्यास सुरुवात केली आहे. याआधी केवळ थकबाकी असलेल्या चालकांच्या घरी नोटिसा दिल्या जात होत्या आणि त्यांना दंड भरण्यास सांगण्यात आले होते. वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून अशा प्रकारची कारवाई टाळावी, असे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

# म्हाडा वसाहतीत पालिकेने बांधला निकृष्ट दर्जाचा रस्ता


## वर्षभरातच रस्ता झाला खराब


■ होम टाइम्स टीम

**मुलुंड पूर्वेकडील म्हाडा वसाहतीत असलेल्या साईनाथ चौक ते डेड अँड बंगलो या परिसरातील ४०० मीटरचा कोट्यवधी रुपये खर्च करून तयार केलेला सिमेंट कॉंक्रिट रस्ता निकृष्ट दर्जाचा असल्याचे उघडकीस आले आहे. रस्त्यावर जागोजागी भेगा पडल्या आहेत. पालिका प्रशासनाच्या निदर्शनास या गोष्टी आणून दिलेल्या असतानाही पालिकेकडून संबधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याऐवजी भेगा पडलेल्या काही ठिकाणी फक्त मलमपट्टी करून खराब झालेला रस्ता पुन्हा लोकांच्या वापरकरिता दुरुस्त केला जात आहे.**

वर्षभरापूर्वी मुलुंड म्हाडा वसाहत परिसरात असलेल्या साईनाथ चौक ते डेड अँड बंगलो या परिसरात रस्त्याच्या कॉंक्रीटीकरणाचे काम करण्यात आले. पालिके मार्फत करण्यात आलेल्या या कामात कोट्यावधी रुपयांचा खर्च झाला. हा सर्व पैसा जनतेच्या खिशामधून खर्च करण्यात आला. मात्र असे असतानाही जनतेच्या खिशातून खर्च झालेल्या या पैशाचा जनतेला योग्य लाभ झाला नाही. कारण वर्षभरातच या रस्त्याला ठिकठिकाणी भेगा पडल्या आहेत. त्याची दुरावस्था झाली आहे. सुरुवातीला पालिकेकडून दोन टप्प्यात हे काम करण्यात आले होते. पहिला पॅच तयार झाल्यानंतर दुसऱ्या पॅचचे काम पालिकेकडून हाती घेण्यात आले. परंतु या आधीच पहिल्या पॅचवर ३० ते ४० ठिकाणी भेगा पडल्या. त्यामुळे सदर कामाच्या दर्जाबाबत नागरिकांनी आवाज उठविला. परंतु पालिका अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष करत रस्त्यांच्या मधोमध पॅच असलेल्या ठिकाणी केमिकल्स टाकून हे पॅच भुजविण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीदेखील हे पॅच बुजले गेले नसल्यामुळे तसेच सबंधित विभागाकडून या संदर्भात सूचना दिल्या गेल्यामुळे हे पॅच कंत्राट दाराकडून बुजविण्याचा प्रयत्न केला गेला. या संपूर्ण खटाटोपात आतापर्यंत ७०% रस्त्यावरील पॅच उखडून त्या ठिकाणी पुन्हा नवीन पॅच बनविण्यात आले आहेत. एकंदरीत हा रस्ता पुन्हा एकदा तयार केला. त्यामुळे नागरिकांनी आवाज उठविल्यामुळे या रस्त्याच्या डागडुजीला पुन्हा सुरुवात झाली आहे. मात्र यात पालिकेचे कोट्यावधी रुपये खर्च झाले त्या रस्त्यावर पुन्हा एकदा अशा प्रकारे मलपट्टी करावी लागत आहे. परंतु उर्वरित रस्ता देखील अशाच पद्धतीने खराब अवस्थेत असल्यामुळे त्याचे देखील पॅच उखडून ते पुन्हा दुरुस्त करावेत अशी मागणी नागरिक करत आहेत. दरम्यान सदर रस्त्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यावर रस्त्याची पाहणी करून या ठिकाणी तडे गेलेल्या ठिकाणी योग्य त्या उपाययोजना केल्या जातील अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.





# महापालिकेने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी झाली सुरु

## मुलुंडमधील दोघा बिल्डरांना बजावल्या नोटिसा



■ **होम टाइम्स टीम**

मुंबईतील वायूप्रदूषण कमी करण्यासाठी मुंबई महापालिकेने गेल्या आठवड्यात जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनंतर मुलुंड टी वॉर्डने बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी नोटिसा देण्याचे काम सुरू केले आहे. मुलुंडमधील दोन बांधकाम व्यावसायिकांना काम थांबवण्याच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत.

मुंबईची हवेची गुणवत्ता दिल्लीपेक्षाही खराब होत आहे. याबाबत नुकतेच सर्वेक्षणही करण्यात आले. ज्यामध्ये बांधकामाधीन जागा आणि मुंबईत सुरू असलेली बांधकामे यांना जबाबदार धरण्यात आले आहे. या बांधकामाधीन जागेबाबत मुंबई महापालिकेने अनेक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली असून, त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान एकीकडे मुलुंडमधील अनेक भागात हे नियम पाळले जात आहेत, तर दुसरीकडे अजूनही अनेक बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी या नियमांची पायमल्ली केली जात आहे. याबाबत आतापर्यंत मुलुंडमधील दोन बिल्डरांना नोटीस देण्यात आली असून त्यात प्रेस्टीज ग्रुप आणि नीलम बिल्डरचा समावेश आहे. या दोन्ही बांधकाम व्यावसायिकांच्या सुरू असलेल्या जागेवर काम थांबवण्याचे आदेश देण्यात आल्याचे समजते.

# प्रदूषण पसरवणाऱ्या विकासकांना टी वार्डची तंबी

## ६० विकासकांसोबत सहायक आयुक्तांची बैठक

■ **होम टाइम्स टीम**

**मुंबईसह उपनगरांमध्ये वाढलेल्या प्रदूषणाच्या स्तरामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रदूषणामुळे सर्दी, खोकला अशा तत्सम आजारांनी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच ग्रासले आहे. पालिका प्रशासनाने याची गंभीर दखल घेत प्रत्येक प्रभाग स्तरावर आता कार्यवाहीला सुरुवात केली आहे.**

मुलुंडच्या टी प्रभागाकडून मुलुंड सर्व वार्डांमध्ये विकासकांची बैठक घेण्यात आली. ज्यामध्ये १५ दिवसात सर्व विकासकांना प्रदूषण रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी प्रत्येक बांधकाम साईटवर धुळीचा स्तर कमी करण्यासाठी ती हवेत मिसळू नये यासाठी बांधकाम क्षेत्रात स्प्रिंकलर्स बसविण्याच्या सूचना केल्या आहेत. या सोबतच धूळ हवेत उडू नये यासाठी स्मोक गण बसविण्याचे तसेच एखाद्या बांधकामाची उंची कमी असेल तर २५ फुटांपर्यंतचे बॅरिकेटिंग करणे, ग्रॅनाईट टाइल्स यांसारखी कामे इमारतीच्या आताच करण्याच्या सूचना प्रभाग कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत. मुलुंडच्या टी प्रभागाचे सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार मिहीर कोटेचा यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली.



या बैठकीमध्ये ६० विकासक आणि त्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. १५ दिवसात सर्व बाबींची पूर्तता करण्याचे आदेश प्रभाग कार्यालयाकडून देण्यात आले आहेत. परंतु इतक्या कमी कालावधीमध्ये प्रदूषण रोखण्यासाठी लागणारे स्प्रिंकलर्स तसेच स्मोक गण यांची पूर्तता कशी करावी अशा संभ्रमावस्थेत विकासात आहेत. या सर्व गोष्टींसाठी लागणाऱ्या मालाची कमतरता सध्या बाजारात असल्यामुळे त्या वेळेत उपलब्ध होऊ शकणार नाहीत. असे विकासाकांचे म्हणणे आहे. यावर देखील आता पालिका प्रशासनाकडून तोडगा काढला जात आहे.

## सं | पा | द | की | य ■ हेमांशू कोठारी

# चला पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करूयात

दिवाळी सणाला अवघे काही दिवस उरले आहेत. यावर्षी, दिवाळीचा सण शुक्रवार, १० नोव्हेंबर २०२३ रोजी धनत्रयोदशीपासून सुरू होणार असून बुधवार, १५ नोव्हेंबर २०२३ रोजी भाऊबिजेने दूजने समाप्तहोणार आहे. त्यादृष्टीने मुलुंडमधील अनेक भागात बाजारपेठा सजल्या आहेत. येत्या शनिवारी आणि रविवारी लोकांकडून दिवाळीच्या खरेदीसाठी मोठी गर्दी झालेली पाहायला मिळणार आहे. मात्र मुंबईतील वाढते प्रदूषण मुंबईकरांसमोर मोठे संकट म्हणून उभे ठाकले आहे. त्यामुळे यंदाची दिवाळी प्रदूषणमुक्त करणे अत्यंत गरजेचे आहे. दसरा, दिवाळी आणि नंतर ख्रिसमस, नवीन वर्ष असे सगळे सण एकामागून एक येतात. पण वाढते प्रदूषण थांबवणे अत्यंत आवश्यक झाले आहे. त्यासाठी मुंबईकरांना पुढे येऊन नियमांचे पालन करावेलागणार आहे. फटाक्यांच्या प्रदूषणामुळे वातावरणातील प्रदूषणाची पातळी वाढते, अशा प्रदूषणाने आरोग्य समस्या आणि अस्तित्व धोक्यात येऊ शकते. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि आजारी लोकांना धोका निर्माण करते. वायू प्रदूषण कमी करण्यासाठी दिवाळीच्या काळात काही उपाय करता येण्यासारखे आहेत. फटाक्यांचा वापर कमी करा किंवा पूर्णपणे बंद करा, जास्तीत जास्त वायूप्रदूषण पातळी असताना बाहेर जाणे टाळा, हवा शुद्धीकरण उपकरणे जसे की एअर प्युरिफायर स्थापित करा आणि अधिक झाडे लावा, योग्य प्रकारचा फेस मास्क वापरा, विशेषत: जर तुम्ही लहान मुले, वृद्ध लोक आणि अस्थमासारख्या आजारांना ग्रस्त असाल., प्रदूषणामुळे अनेकजण आजारी पडत आहेत. दिपावली हा दिव्यांचा सण असला तरी या उत्सवात फटाक्यांची आतषबाजी मोठ्या प्रमाणात केली जाते. दरवर्षी फटाके फोडल्याने सर्वसामान्यांवर विपरित परिणाम होतो आणि त्याच बरोबर वातावरणातील वायू प्रदूषणाचा आलेख लक्षणीयरित्या वाढतो. विशेषत: आजारी आणि वृद्ध नागरिकांना वायू प्रदूषणामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आता कोरोनाचा संसर्गही मोठ्या प्रमाणात झाला आहे. वायू प्रदूषणासोबतच श्वसनाच्या आजारांचे मूळ कारणही कोरोना आहे. त्यामुळे फटाक्यांऐवजी अधिकाधिक दिवे लावा आणि दिवाळी साजरी करा, प्रत्येक व्यक्तीला वाटते की मी एकट्याने खबरदारी घेतली तर काय होईल? मात्र प्रत्येकाने विचार बदलून वाढते प्रदूषण कमी करण्याचा विचार केला तर कदाचित लवकरच मुंबईही प्रदूषणमुक्त होईल. तुम्ही उचललेले प्रत्येक पाऊल नागरिकांसाठी वरदान ठरू शकते. फटाक्यांबाबत मुलांच्या अवास्तव मागण्या पूर्ण करू नका. दिव्यांचा विचार केला तर आपण भरपूर प्रकाशयोजना करतो. त्यामुळे मातीच्या दिव्यांची मागणी वाढली आहे. गेली अनेक वर्षे पंतप्रधान लोकल फॉर व्होकलवर भर देत आहेत. यामुळे नागरिकांनीही दिवाळीच्या काळात चायनीज साधनांचा वापर कमी करावा. हळूहळू परंपरा सोडून दिवाळी साजरी करण्याचा नवा ट्रेंड सुरू झाला आहे. पूर्वीच्या काळी दिवाळीच्या वेळी मातीचे दिवे लावले जायचे, ज्यामध्ये घरे उजळण्यासाठी तेल आणि वात वापरली जायची. पण आजकाल लोक नवनवीन सुगंधी मेणबत्त्या पेटवून दिवाळी साजरी करत आहेत. पण ते कुठेतरी घातकही ठरत आहे. त्यामुळे या आकर्षक वस्तूंमुळे लोक कमी प्रमाणात स्थानिक वस्तू खरेदी करतात. त्यामुळे ग्राहकांची पसंती लक्षात घेऊन दुकानदारही आपल्या दुकानात चायनीज वस्तू ठेवतात. सजावटीची फुले, रंगीबेरंगी इलेक्ट्रिक फ्रिल्स, स्टिकर्स, रेडिमेड रांगोळी आदींना लोक पसंत करत आहेत. लोक देशभक्तीबद्दल बोलतील आणि म्हणतील की आपण स्वदेशी गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत. मात्र या सणांच्या काळात आपल्या देशाशी आणि मातीशी संबंधित व्यवसायाचा विचार कोणी करताना दिसून येत नाही. आपण जशी पर्यावरणपूरक होळी साजरी केली, तशीच पारंपरिक दिवाळी साजरी करण्याची गरज आहे. स्टिकर्सऐवजी दारावर रंगीबेरंगी रांगोळी अधिक चांगली दिसते, प्लास्टिकच्या कृत्रिम तोरणांऐवजी दारावर झेंडूच्या फुलांचा हार अधिक चांगला दिसतो. त्याच बरोबर मातीचा दिवा पेटवण्याचा आनंद मेणबत्ती पेटवण्यासारखा नसतो. यापुढे प्रत्येक कुटुंबाने पारंपरिक दिवाळी साजरी करण्याची प्रतिज्ञा घेणे गरजेचे आहे, तरच भावी पिढ्यांना त्याचे महत्त्व समजेल आणि प्रदूषण देखील कमी करता येईल.

# मुंबईकरांचा ऑक्टोबर झाला कुल



## गारव्याने केली हीटवर मात

■ होम टाइम्स टीम

उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे मुंबईच्या हवामानात बदल झाला आहे. त्यामुळे ऑक्टोबर हीटपासूनलोकांना काहीसा दिलासा मिळालाय. तर येत्या काही दिवस मुंबईतील हवामान असेच कुल कुल राहण्याचा अंदाज आहे.

अलीकडे ऑक्टोबर हीटमुळे मुंबईकरांना उकाड्याचा सामना करावा लागत होता. मात्र आता उकाड्याचे रूपांतर गारव्यात होऊ लागले आहे. माहितीनुसार, मुंबईतील काही भागात दुपारी तापमान ३५ अंशांवर पोहोचले होते. मात्र आता मुंबईचे हवामान बदलू लागले आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे मुंबईच्या हवामानात बदल झाला असून मुंबईसह महाराष्ट्रातील कमाल तापमानात तीन ते चार अंश सेल्सिअसने खाली आले आहे. पुढील काही दिवस असेच वातावरण राहण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून तापमानात आणखी घसरण होण्याची शक्यता आहे. हवामानातील या बदलामुळे ऑक्टोबर हीटमुळे त्रस्त झालेला मुंबईकर काहीसा सुखावलेला दिसतो आहे.

# उघडा डोळे, बघा नीट!



मुलुंड पोलीस ठाण्याच्या बाहेरील चकाचक रस्त्यावर दिसणारे हे दृश्य आहे बरे! तो काही रंगीत तबू नाही हं, तर त्यात आहे जुगाड! जो रस्त्यावरील उघड्या आणि जीवघेण्या ड्रेनेजला झाकण्यासाठी केला गेलाय. मुलुंडभरातुन या पोलीस ठाण्यात येणाऱ्यांना या जुगाडाचे दर्शन होतेय. हा रस्ता रहदारीचा आणि नेहमी गजबजलेला असल्याने त्यावरून ये-जा करणाऱ्यांनाही ते दिसतेय. काय बरे वाटत असेल त्यांना हे चित्र पाहून? टी वॉर्डच्या अधिकाऱ्यांबद्दल काय म्हणत असतील ते?

# फसलेल्या पार्किंग झोनच्या विरोधात मनसे रस्त्यावर

## सह्यांची मोहीम घेऊन केला प्रशासनाचा विरोध

■ होम टाइम्स टीम

**मुलुंडमधील वाहतूककोंडी आणि पार्किंगची समस्या प्रशासनाला सोडवता आलेली नाही. एकीकडे अनावश्यक ठिकाणी पार्किंग झोन तयार करण्यात आले आहेत, तर दुसरीकडे ज्या ठिकाणी पार्किंगची सुविधा असणे अत्यावश्यक आहे अशा ठिकाणी पार्क केलेल्या गाड्यांवर पालिका आणि वाहतूक विभागाकडून मोठ्या प्रमाणात दंड लावला जात आहे. मनसेने या कारवाईच्या विरोधात मुलुंड पूर्वेकडे स्वाक्षरी मोहीम राबविली आहे.**

मुलुंडमध्ये विविध ठिकाणी पालिका प्रशासनाकडून पार्किंग झोन बनविण्यात आलेले आहेत. परंतु त्याचे योग्य नियोजन होत नसल्यामुळे या पार्किंग झोनला वाहनचालकांकरून फारच कमी प्रतिसाद मिळत आहे. पालिका आणि वाहतूक विभागाकडून एकीकडे पार्किंग झोनमध्ये वाहने पार्क करण्याचे आवाहन केले जात असले तरी दुसरीकडे मात्र पार्किंगची सुविधा सांभाळण्यात पालिकेला अपयश आल्याने रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्क केली जात आहेत. यावर उपाय म्हणून मुलुंड पूर्व परिसरात विविध ठिकाणी पालिका प्रशासनाने नो पार्किंगचे फलक लावून दंडात्मक



कारवाईला सुरुवात केली आहे. प्रशासनाच्या या कारवाईचा मनसेकडून विरोध केला जात आहे. त्यासाठी मनसेकडून स्वाक्षरी मोहीम हाती घेण्यात आली आहे. मनसेचे उपाध्यक्ष सत्यवान दळवी यांच्या नेतृत्वात मुलुंड पूर्व रेल्वे स्थानक परिसरात ही स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. नागरिकांच्या स्वाक्षरी मोहिमेनंतर सदर निवेदन हे वाहतूक विभाग आणि पालिका प्रशासनाला दिले जाणार आहे. नो पार्किंगचे फलक लावले असल्यामुळे त्या ठिकाणी वाहने पार्क केल्यावर वाहतूक पोलिसांकडून वाहन चालकांवर दंड आकारला जातो. दुचाकीचालकांना याचा जास्त फटका बसत आहे. खरंतर मुलुंड पूर्व रेल्वे स्थानक परिसर, हनुमान चौक, म्हाडा कॉलनी अशा अनेक रहदारीच्या ठिकाणी हे फलक लावले गेले आहेत. शिवाय या ठिकाणी वाहतूक विभागाकडून रोज कारवाई देखील केली जात आहे. याचा नाहक फटका वाहन चालकांना बसत आहे. त्यामुळे जोपर्यंत मुलुंड पूर्वेकडे पार्किंगची व्यवस्था केली जात नाही तोपर्यंत या ठिकाणी रस्त्यांवर अनावश्यक नो पार्किंगचे फलक लावले जाऊ नये अशी मनसेची मागणी आहे.

# मध्य रेल्वेच्या १० नवीन एसी गाड्या धीम्या मार्गावर चालवणार

## प्रवाशांमध्ये पसरली नाराजी

■ होम टाइम्स टीम

**प्रवाशांच्या सुविधा लक्षात घेऊन मध्य रेल्वेने १० नवीन वातानुकूलित लोकल धीम्या मार्गावर चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या लोकल गाड्या ६ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाबाबत इतर प्रवाशांमध्ये नाराजी पसरल्याचे पाहायला मिळत असून एसी लोकल गाड्यांचे भाडे कमी करण्याची मागणी केली जात आहे.**

प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने १० नवीन एसी लोकल सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ६ नोव्हेंबरपासून या सुविधा सुरू होणार आहेत. यामुळे आता मध्य लाईनवर धावणाऱ्या एसी लोकलची संख्या ५६ वरून ६६ होणार आहे. या नव्या एसी गाड्या सोमवार ते शनिवार या कालावधीत चालवण्यात येणार आहेत. सर्व लोकल धीम्या मार्गावरधावणार आहेत. या मार्गावर अतिरिक्त एसी गाड्या चालवण्यासाठी, रेल्वेने १० नॉन-एसी गाड्यांचे एसी गाड्यांमध्ये रूपांतर केले आहे. ही सुविधा सीएमटी ते अंबरनाथ, सीएमटी ते कल्याण, सीएमटी ते डोंबिवली आणि सीएमटी ते परळ आदी मार्गावर सुरू होणार आहे. मध्य रेल्वेच्या या प्रयत्नामुळे रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल, असा अंदाज आहे. एकीकडे मध्य रेल्वेने प्रवाशांच्या सोयीसाठी एसी लोकलची संख्या वाढवली आहे, तर दुसरीकडे रेल्वेच्या या निर्णयाबाबत काही प्रवाशांमध्ये नाराजी आहे. एसी रेल्वेचे भाडे खूप जास्त असल्याने एसी रेल्वेच्या तुलनेत सर्वाधिक प्रवाशी सामान्य रेल्वेने प्रवास करतात, असेप्रवाशांचे मत आहे. मध्य रेल्वेने एसी लोकलची संख्या वाढवण्याबरोबरच त्यांचे भाडे कमी करण्याचे मार्ग शोधावेत. हळूहळू एसी लोकलची संख्या वाढवणे आणि नॉन-एसी लोकलचे एसी लोकलमध्ये रूपांतर केल्यास त्याचा परिणाम प्रवाशांवर होणार आहे.



*"वातानुकूलित लोकलचे भाडे खूप जास्त असून, १० रुपयांच्या भाड्याऐवजी नागरिकांना ४० ते ५० रुपये मोजावे लागतात, त्यामुळे नागरिकांच्या खिशावर परिणाम होतो, त्यामुळे वातानुकूलित लोकलची संख्या वाढण्याबरोबरच स्थानिक, त्याचे भाडे कमी करणे गरजेचे आहे.याचाही प्रशासनाने विचार करावा.*

– बिंदू पाल
(रेल्वे प्रवासी)

*"नागरिकांच्या सोयीसाठी रेल्वे अशा प्रकारची मोहीम सुरू करणार आहे परंतु अजूनही असे अनेक नागरिक आहेत ज्यांच्यासाठी रेल्वे हाच एकमेव उपाय आहे ज्याद्वारे ते स्वस्त दरात कामापर्यंत पोहोचू शकतात.मध्यमवर्गीय कुटुंबातून येणाऱ्या लोकांबद्दल रेल्वे प्रशासन याचाही विचार करावा.*

– विवेक जाधव
(रेल्वे प्रवासी)

# डेंग्यूच्या नमुन्यांची केली जाणार जीनोम सिक्वेन्सिंग

## वाढती रुग्णसंख्या पाहता महापालिकेने उचलले पाऊल

■ **होम टाइम्स टीम**

डेंग्यूचे वाढते रुग्ण पाहता या नमुन्यांची जीनोम सिक्वेन्सिंग करण्याचा निर्णयही महापालिकेने घेतला आहे. सध्या हे नमुने महापालिकेचे दवाखाने व रुग्णालये तसेच खासगी रुग्णालयांतून गोळा करण्यात येत आहेत.

या वर्षी डेंग्यू आणि मलेरियाच्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत मुंबई महापालिकेने डेंग्यूच्या रुग्णांच्या



नमुन्यांचे जीनोम सिक्वेन्सिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. जीनोम सिक्वेन्सिंगमुळे डेंग्यूचा कोणता विषाणू नागरिकांसाठी अधिक धोक्याचा ठरणारा आहे याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाला मिळण्यास मदत होणार आहे. पालिका सध्या जीनोम सिक्वेन्सिंगसाठी नमुने गोळा करत आहे. हे नमुने पालिका दवाखाने, रुग्णालये आणि खासगी रुग्णालयांमधूनही गोळा केले जात आहेत. डेंग्यू पॉझिटिव्ह आढळल्यास रुग्णांच्या रक्त नमुन्यांची जीनोम सिक्वेन्सिंग केली जाणार आहे. पालिका आरोग्य विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, १ जानेवारी ते २२ ऑक्टोबर या कालावधीत डेंग्यूचे ४ हजार ३८४ रुग्ण आढळले आहेत. मुलुंडबद्दल बोलायचे झाले तर मुलुंडमध्ये १८ दिवसांत डेंग्यूचे ५२ रुग्ण आढळले आहेत. यामुळे प्रशासनाची चिंता वाढली आहे. एकीकडे पालिकेकडून जीनोम सिक्वेन्सिंग केली जात असताना नागरिकांनाही सावधगिरी बाळगावी असे आवाहन पालिकेकडून करण्यात आले आहे.

# ऐरोली ब्रिजचा रस्ता बनलाय मृत्यूचा मार्ग

■ **होम टाइम्स टीम**

**मुलुंडच्या पूर्व द्रुतगती मार्गाजवळ असलेला ऐरोली ब्रिज वाहन चालकांसाठी मृत्यूचा सापळा बनला आहे. गेल्या दोन महिन्यात या ठिकाणी झालेल्या चार अपघातात तीन जणांचे मृत्यू झाले आहेत. मंगळवारी भरधाव वेगाने आलेल्या वाहनाचा नियंत्रण सुटल्यामुळे झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे.**



विक्रोळीत राहणारे मनसब अली खान त्यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी त्यांच्या दोन सहकाऱ्यांसह सकाळी १०:००च्या सुमारास वाशी येथे जात होते. पूर्व दुर्गती मार्गावरून ऐरोली ब्रिजच्या दिशेने असलेला टोलनाका ओलांडून जात असताना त्यांच्या समोरून असलेल्या डंपर चालकाने अचानक ब्रेक दाबला. डंपर धडकू नये म्हणून त्यांनी डंपर उजव्या बाजूला वळवला. मात्र वाहनाचा वेग जास्त असल्यामुळे हे डंपर डिव्हायडर वरून दुसऱ्या बाजूला असलेल्या लेनवर गेले आणि समोरून येणाऱ्या टेम्पो ट्रकवर जाऊन धडकले. या घटनेत मनसब आणि त्याचा सहकारी जखमी झाला. त्यांना तातडीने मुलुंड मधील वीर सावरकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. ज्यामध्ये उपचारा दरम्यान मनसबचा सहकारी मोहसीन मोहम्मद इब्राहिमचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ऐरोली ब्रिजवर नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेली ही अपघातांची मालिका अजूनही कायम आहे. या ठिकाणचा रस्ता अपघात प्रवाह क्षेत्र म्हणून घोषित करून या ठिकाणी वेग मर्यादा उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्याची मागणी मुलुंडकरांकडून होत आहे.

# सावत्र आईचे सैतानी वागणे, मुलीला दिले अगरबत्तीचे चटके

■ **होम टाइम्स टीम**

नवघरमध्ये सावत्र आईने १० वर्षीय मुलीला लाकडी दांडक्याने मारहाण करून अगरबत्तीने चटके दिल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. मुलीसोबत कौर्याने वागणाऱ्या आईच्या विरोधात नवघर पोलिसांनी ज्युवेनाईल कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३३ वर्षीय तक्रारदार अर्जुन (नाव बदलले आहे) मुलुंड पूर्वेतील रहिवासी असून कपड्याचा व्यवसाय करतात. २०१६ मध्ये अर्जुनने त्याची पहिली पत्नी लीला (नाव बदलले आहे) सोबत घटस्फोट घेतला. त्यानंतर त्याने रुपा (नाव बदलले आहे) नामक ३६ वर्षीय महिलेशी लग्न केले होते. तिचा समीर (नाव बदलले आहे) नामक व्यक्तीसोबत २०१८ मध्ये घटस्फोट झाला होता.अर्जुनला त्याची पहिली पत्नी लीलापासून एक मुलगी आणि रूपाला तिचा पहिला पती समीरपासून १० वर्षांची मुलगी आहे. अर्जुन आणि रूपा दोघेही त्यांच्या मुलींसोबत आनंदाने राहत होते. मात्र गेल्या काही महिन्यांपासून अर्जुन आणि रुपा यांच्यात छोट्या-छोट्या गोष्टींवरून भांडण होत होते. यासंदर्भात रूपा यांनी सप्टेंबर महिन्यात नवघर पोलीस ठाण्यात लेखी जबाबही दिला होता. मात्र, काही दिवसांनी रूपा ही अर्जुनच्या पहिल्या पत्नीच्या मुलीला काठीने नाहक मारहाण करत असे तसेच अगरबत्तीने चटके देत असे. ही माहिती अर्जुनला समजल्यानंतर त्याने नवघर पोलीस ठाण्यात जाऊन या प्रकाराविरोधात रूपाच्या विरोधात गुन्हा दाखल केला. नवघर पोलिसांनी रूपाविरुद्ध भादंवि कलम ५०६, ३२४ अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# एकाच रात्रीत अनेक दुकानांचे शटर तोडून झाली चोरी

## परिसरात पसरले भीतीचे वातावरण

■ होम टाइम्स टीम

**मुलुंड परिसरात एकाच रात्रीत पाच दुकानांचे शटर तोडून चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मुलुंड पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे. मात्र चोरट्यांनी एका रात्रीत दुकानांचे शटर तोडून असा प्रकार घडविल्याने पोलिसांच्या गस्तीबाबत कायदा व सुव्यवस्थेबाबत नागरिकांच्या मनात प्रश्न उपस्थित होत आहेत.**





सध्या मुलुंडमध्ये घरे आणि दुकाने फोडून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अशीच एक घटना शुक्रवारी पहाटे मुलुंडमध्ये उघडकीस आली. मुलुंड पश्चिम एलबीएस रोडवरील रुणवाल कमर्शिअल कॉम्प्लेक्समध्ये एकाच वेळी दोन दुकानांचे शटर तोडून चोरी झाली. यासोबतच मुलुंड पश्चिम एसएन रोड आणि पाच रास्ता परिसरातही दोन अज्ञातांनी शटर तोडून चोरीचा प्रयत्न केला. एवढेच नाही तर मुलुंडमधील इतर अनेक दुकानांमध्येही अशाच प्रकारे चोरीचे प्रयत्न झाले आहेत. ही घटना उघडकीस आल्यानंतर मुलुंड पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू आहे. मात्र मुलुंड परिसरात पाच चोरी करणाऱ्या दोन तरुणांचे सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाल्यानंतर नागरिकांनी पोलिसांच्या गस्तीबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

> *एकाच रात्रीत अशी अनेक दुकाने फोडण्यात आल्याने पोलिसांच्या गस्तीवर, कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. सणासुदीच्या काळात नागरिकांना खरेदी करता यावी म्हणून दुकानांमध्येही विविध प्रकारचा साठा भरला आहे. या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन परिसरात पोलिस तैनात करण्याबरोबरच गस्तही वाढवावी.*
>
> – धर्मेश मिश्रा, मुलुंडचे रहिवासी

> *अंधाराचा फायदा घेत दुकानांचे शटर तोडून चोरीचा प्रकार मुलुंडमध्ये प्रथमच उघडकीस आला असून या घटनेतून धडा घेऊन आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, तसेच पोलिसांनी गस्त वाढवावी.*
>
> – प्रतीक जोशी, मुलुंडकर

# महिलांचा विनयभंग करणाऱ्या तरुणाला अटक

## भल्या पहाटे कामावर जाणाऱ्या एकट्या महिलांना करायचा टार्गेट

■ होम टाइम्स टीम

मुलुंडमध्ये एका सिरीयल मॉलेस्टरला मुलुंडच्या नवघर पोलिसांनी अखेर गजाआड केले. गेल्या वर्षभरापासून या सिरीयल मॉलेस्टरच्या मागावर पोलीस होते. त्याच्यावर दाखल झालेल्या एका तक्रारीनंतर पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपासाने या सिरीयल मॉलेस्टारला बेड्या ठोकल्या.

मुलुंड पूर्वेकडे पहाटे कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या महिलांना निर्जन स्थळी फिरून अश्लील चाळे करून पसार होण्याचा प्रकार गेल्या वर्षभरापासून सुरू होता. यासंदर्भात मुलुंड पोलीस ठाण्यात तक्रारी प्राप्त होत होत्या. परंतु हा इसम नेमका कोण आहे, याचा तपास मात्र पोलिसांना करता येत नव्हता. अखेर ऑक्टोंबर ७ रोजी अशीच एक तक्रार घेऊन महिला नवघर पोलीस ठाण्यात आली. तिने सांगितलेल्या वर्णनावरून पोलिसांनी या आरोपीचा माग काढण्याचा कामाला गती दिली. पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण कक्षाची टीम कामाला लागली. हा इसम पहाटेच दुचाकीवरून यायचा आणि नियोजन स्थळी चालत असलेल्या महिलेला हेरून तिच्यासोबत अश्लील चाळे करून तिथून फरार व्हायचा. त्याची गुन्ह्या करण्याची ही पद्धत सर्व प्रकरणांमध्ये सारखेच होती. त्यामुळे नवघर पोलिसांनी तब्बल ४०० सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि



हा आरोपी नेमका कुठपर्यंत प्रवास करतो याची माहिती गोळा केली. यासोबतच गुन्हा घडला त्या दिवशी त्याच्यासोबत असलेल्या आणखी एका व्यक्तीची देखील पोलिसांनी तपासणी केली. त्याची चौकशी केली असता पोलिसांना हा आरोपी सापडला. ३२ वर्षाचा सुरेंद्र वंजारी असून नामक हा नराधम ठाण्याच्या कोपरी परिसरात राहणारा असल्याचे समजले. लागलीच पोलिसांनी तात्काळ या सुरेंद्र वंजारीच्या मुसक्या आवळल्या. तो एका हॉटेलमध्ये कॅशियरचे काम करत होता. सकाळीच मुलुंड परिसरात येऊन कामासाठी घराबाहेर पडलेल्या महिलांना हेरून तो त्यांचा विनयभंग करायचा आणि घटनास्थळावरून तात्काळ पसार व्हायचा. पोलिसांना गुंगारा देण्यासाठी तो तासभर मुलुंड पूर्व आणि पश्चिमेकडे गिरट्या घालायचा. जेणेकरून कोणालाच सीसीटीव्ही फुटेज मधून देखील त्याचा ठाव ठिकाणा घेता येऊ नये. नंतर तो ठाणे गाठायचा. त्या ठिकाणी देखील काही काळ फेरफटका मारल्यावर तो त्याच्या घरी जायचा. परंतु पोलिसांनी कौशल्य पणाला लावून अखेर त्याला ठाण्यामधून जेरबंद केले. सदरची कारवाई नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय गिरफ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक धाडवे आणि पथकातील सुरेश पाटील, शिवकुमार वाघचौरे, संतोष गुटे, काळे यांनी केली.

Volume : IX | Issue : 32 होम टाइम्स

# मोबाईलही गेला आणि पैसेही...

## स्वस्तात आयफोन घेण्याच्या आमिषाने गमावले ८४ हजार रुपये

**होम टाइम्स टीम**

सध्या मोबाईल प्रेमींमध्ये आयफोनची क्रेझ वाढलेली दिसून येत आहे. त्याचाच फायदा घेत स्वस्तातला आयफोन मिळविण्याच्या प्रयत्नात मुलुंड मधील आतिफ खान नामक व्यक्तीला चक्क ८४ हजाराचा चुना लागला आहे.




मुलुंडमध्ये राहणारे आतिफ खान एक्स या साईटवर आयफोन१४ प्रो हा मोबाईल ८४ हजारात मिळत असल्याचे दिसले. त्याने ही पोस्ट टाकलेल्या राजेंद्र कोळी नामक व्यक्तीला मोबाईल घेण्यास तयार असल्या संदर्भात मेसेज केला त्यानंतर राजेंद्र कोळीने हा मोबाईल हवा असल्यास तो मुलुंड मधील सिद्धिविनायक मोबाईल शॉपमध्ये यावे लागेल असे सांगितले. त्यानंतर आतिफ याने सिद्धिविनायक टेलिकॉम येथे जाऊन सदर मोबाईल पाहिला असता तो पेटी पॅक असल्याचे समजले. तसेच या शॉप मधील एका व्यक्तीशी राजेंद्र कोळी याचे बोलणे देखील झाले. त्यानंतर आतिफ याने हा मोबाईल उघडून त्यामध्ये स्वतःचा एप्पल आयडी देखील टाकला आणि मोबाईलला स्क्रीन गार्ड लावून तो राजेंद्र कोळीची पुन्हा फोनवरून संपर्क केला.

यावेळी राजेंद्र कोळीने त्याच्याकडे पैशाची मागणी केली असता राजेंद्र कोळी यांच्या यूपीआय अकाउंट वर आतिफने ८४ हजार ट्रान्सफर केले. तो शॉप मधून निघत असताना शॉपचा मालक तिथे आला आणि त्याने आतिफला थांबवून दिलेल्या मोबाईल संदर्भात विचारणा करून आपण याचे पेमेंट केले नाही असे सांगितले. परंतु अतिफिने सगळ्या गोष्टी मालकाला सांगितल्या. हे ऐकून शॉपचा भांबावून गेला. त्याने त्याच्या कर्मचाऱ्याकडे देखील विचारणा केली. परंतु त्याला समाधानकारक उत्तर देता आले नाही.

अखेर शॉपचा मालक आणि आतिफ हे दोघे मुलुंड पोलीस ठाण्यात गेले आणि राजेंद्र कोळी नामक भामट्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. स्वस्त दरात आयफोन मिळवण्याच्या लोभापाई आतिफ याने तब्बल ८४ हजार रुपये गमावले. अशा प्रकारे त्याचा मोबाईलही गेला आणि पैसेही गेले. आता मुलुंड पोलिसात याबाबत अधिक तपास करत आहेत.

# घराचा दरवाजा तोडून चोरट्यांनी केली सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**होम टाइम्स टीम**

अज्ञात व्यक्तीने घराचा दरवाजा तोडून घरात ठेवलेले सोन्याचे दागिने चोरून नेल्याचा तसेच घराच्या बाल्कनीतून उडी मारून उडी पसार झाल्याचा प्रकार मुलुंडमध्ये घडला आहे. याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला असून अज्ञात चोरट्याचा शोध सुरु केला आहे.

**मुलुंड पोलिसांकडून तपास सुरू**

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार ३२ वर्षीय अक्षय पाठक हा वीणा नगर येथील रहिवासी आहे. २७ ऑक्टोबर रोजी ते कुटुंबासह नाशिकला गेले होते. दुसऱ्या दिवशी त्यांच्या शेजाऱ्याने फोन करून त्यांना दोन अनोळखी लोक दरवाजा तोडून घरात घुसल्याची माहिती दिली. तत्पूर्वी शेजाऱ्याने त्यांना हाक दिली असता त्यांनी घराच्या बाल्कनीतून उडी मारून पळ काढला. यानंतर तक्रारदार नाशिकहून घरी परतले असता घरात ठेवलेले सोन्याचे दागिने गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. यामध्ये १६ हजार रुपये किमतीचे ४ ग्रॅमचे मंगळसूत्र आणि इतर अनेक सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे. ज्याची एकूण किंमत २५००० रुपये असल्याचे सांगितले जात आहे. तक्रारदाराने मुलुंड पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. मुलुंड पोलिसांनी भादंवि कलम ३४, ३८० आणि ४५४ अन्वये गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. दरम्यान एकीकडे मुलुंड पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत, तर दुसरीकडे या प्रकाराच्या वाढत्या घटना पाहता नागरिकांनाही सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ऑनलाईन टास्कच्या नावे तरुणाची पाच लाखांची फसवणूक

**होम टाइम्स टीम**

मुंबईमध्ये सध्या एका क्लिकवर पैसे कमविण्याचे पेव फुटलेले दिसून येत आहे. याचाच फायदा सायबर गुन्हेगार घेत आहेत. ज्यातून या गुन्हेगारांकडून लाखो रुपयांची लूट केली जात आहे. मुलुंडमध्ये पुन्हा एकदा असाच प्रकार समोर आला आहे. दिलेले ऑनलाईन टास्क पूर्ण झाल्याच्या मोबदल्यात जास्तीत जास्त नफा कमविण्याच्या आमिषाने तब्बल पाच लाखांपेक्षा जास्त रक्कमेला एका तरुणाला मुकावे लागले आहे.

मुलुंडचा रहिवासी असलेल्या तपन ठक्कर याला एका टेलिग्राम साईट वरून भावेशा या महिलेच्या नावावरून मेसेज आला. पार्ट टाइम पैसे कमवायचे असतील तर या लिंक वर क्लिक करा असे त्या मेसेजमध्ये लिहिले होते. त्याने या लिंक वर क्लिक करताच त्याला त्याचे बँक डिटेल्स भरण्यास सांगण्यात आले. त्यानंतर त्याला एक १५० रुपयांचा टास्क देण्यात आला. १५० रुपये टास्कमध्ये भरल्यानंतर तो टास्क पूर्ण केल्यावर त्याच्या अकाउंटवर ५०० रुपये जमा करण्यात आले. त्यानंतर त्याला दुसरा टास्क देण्यात आला. ज्यामध्ये एक हजार रुपये भरण्यास सांगण्यात आले. हजार रुपये या टास्कमध्ये गुंतवल्यानंतर त्याचे त्याला १५०० रुपये परत मिळाले. त्यानंतर त्याला मर्चंट टास्क देण्यात आला. ज्या टास्कमध्ये वेगवेगळे टास्क होते. त्यासाठी त्याला तीन हजार रुपये गुंतवण्यास सांगण्यात आले. हे सदर टास्क पूर्ण केल्यानंतर त्याला ८००० रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर त्याला या संपूर्ण टास्कच्या प्रक्रियेवर विश्वास बसला. त्यामुळे यानंतर त्याला सात ते आठ दिवसांचा टास्क देण्यात येईल असे सांगण्यात आले. यासाठी त्याला टेलिग्राम चैनलवरील टास्कमध्ये ऍड करण्यात आले. ज्यामध्ये त्याला टप्प्याटप्प्याने पैसे भरण्यास सांगण्यात आले. त्यानुसार त्याने या टास्कसाठी तब्बल पाच लाख

बत्तीस हजार ८४७ रुपये गुंतविले. मात्र त्यानंतर त्याच्या सोबत झालेले चॅटिंग भावेशा नामक महिलेने डिलीट केल. हे पाहून तपनने तिच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण त्याचे अकाउंट डी ऍक्टिव्हेट झाले असल्याचे सांगण्यात आले. अखेर तपन त्याला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्याने सायबर पोलिसांमध्ये दिनांक १५ ऑक्टोबर २०२३ रोजी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी घटनेची सत्यता पडताळून अज्ञात व्यक्तीचा विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# वसंत गार्डनच्या स्वच्छतागृहात आढळला महिलेचा जळालेला मृतदेह

## मृत महिला ठाण्याची असल्याचे झाले उघड

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंडच्या वसंत गार्डनमध्ये रविवारी रात्री एका महिलेचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सध्या मृताची ओळख पटली असून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास मुलुंड पोलीस करत आहेत.





मुलुंड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुलुंड पश्चिमेकडील वसंत गार्डनमधील महिलांच्या स्वच्छतागृहाला रविवारी रात्री आग लागल्याची माहिती मिळाली. स्थानिक नागरिकांनी अग्निशमन दल आणि पोलिसांना ही माहिती दिली. आग आटोक्यात आणल्यानंतर एक महिला शौचालयात पडून जखमी झाल्याचे दिसून आले. महिलेला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर महिलेला डॉक्टरांनी मृत घोषित केले. ३५ वर्षीय स्नेहल बोबडे अशी महिलेची ओळख पटली आहे. स्नेहल ही ठाणे येथील रहिवासी आहे. या गार्डनमधील शौचालयात पडलेल्या पर्सवरून तिची ओळख पटली. याबाबत परिमंडळ ७ चे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांनी सांगितले की, ही महिला या गार्डनमध्ये एकटीच आल्याचे आवारात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमधून समोर आले आहे. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.


जसराज ॲन्टिक ®

सरोज गड़ा (मुलुंड-पूर्व) (राईधणजर/गडशीशा)

सणासाठी विशेष ऑफर

10% to 40% डिसकाउंट

१ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये अनेक नवीन डिझाईन्स उपलब्ध

नेत्रदीपक आणि आकर्षक डिझाईन जे मूळ दागिन्यांनाही फिके पाडेल + कुंदन + नेकलेस सेट
पेंटेड ब्युटी लॉंग सेट + चंदनहार + दागिने + जवपतला गोल्ड + रोडियम ब्रेसलेट + चेन
आणि अनेक प्रकारचे आलिशान आणि आकर्षक दागिने

जुन्या आणि नवीन सर्व ग्राहकांचे स्वागत आहे

नागरिकांचा विश्वास म्हणजे जसराज ॲंटिकची खास ऑफर

सणाच्या ऑफरवर १०% ते ४०% सूट

CONTACT : GIRISH GADA - 9821376756 SAROJ GADA - 9821854370

Note: Before coming pl buzz on Cell.

Helpline

सिटीजन रिपोर्टर
78956 78956

होम केबल
022 - 6614 6060

होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा

## जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

– मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक




आरोग्य आशा
डॉ. मोनिषा रावत

# ‘सुजोक’

# कमी प्रतिकारशक्ती-ऋतूतील बदलांदरम्यान...

औषधांशिवाय आणि कोणत्याही दुष्परिणामांशिवाय प्रतिकारशक्ती मजबूत करणे आणि वाढवणे

**ज्या लोकांची प्रतिकारशक्ती कमकुवत आहे त्यांना मोसमी फ्लूचा धोका जास्त असतो.**

*जसजसे हवामान बदलते, तसतसे आपण आपल्या आजूबाजूला अनेक लोकांना सर्दी, फ्लू आणि कमी प्रतिकारशक्तीमुळे इतर आरोग्य समस्यांनी ग्रासलेले पाहतो. म्हणूनच, आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवणे खूप महत्वाचे आहे. कारण संक्रमण आणि इतर रोग टाळण्यासाठी ही आपल्या शरीराची एक महत्वाची संरक्षण प्रणाली आहे. संपूर्ण आरोग्य आणि हालचाल सुधारण्याचा हा एक चांगला मार्ग आहे.*

*आमच्या **‘मोनिषाज मंत्रा’** मध्ये आम्ही लोकांना त्यांची प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतो आणि त्यांच्या संसर्ग आणि आरोग्याच्या समस्यांवर कोणत्याही औषधाशिवाय उपचार करतो.*


- *सर्वप्रथम, संतुलित आहार घ्या.*
- *तज्ञांचे मत आहे की, पोषक (न्युट्रीन्ट) तत्व सप्लिमेंट्स घेण्यापेक्षा संतुलित आहारातून शरीर पोषक द्रव्ये अधिक कार्यक्षमतेने शोषून घेतात. वनस्पती-आधारित आहार खाणे, ज्यामध्ये ॲंटिऑक्सिडंट्स असते. जे सूज कमी करू शकते आणि प्रतिकारशक्ती वाढवू शकते.*
- *रिफाईंड कार्बोहायड्रेट्स आणि पांढऱ्या साखरेचे सेवन मर्यादित करणे.*
- *धूम्रपान सोडणे*
- *शरीर चांगले हायड्रेटेड ठेवणे.*
- *पुरेशी झोप घेणे.*
- *नियमित व्यायाम करणे, जे निरोगी शरीराचे वजन राखण्यास मदत करते, सूज कमी करते तसेच निरोगी रोगप्रतिकार प्रणाली राखण्यास मदत करते.*
- *तिकारशक्ती कमी करण्यासाठी तणाव हे एक महत्त्वाचे कारण आहे, म्हणून नियमित स्मित ध्यान आणि स्माईल ताई-जी यांनी तणावाची पातळी कमी केली जाऊ शकते.*







## सुजोक थेरपी




(चित्र १ प्रमाणे)

- कोणत्याही बोटाच्या मधल्या सांध्याच्या खाली डायग्नोस्टिक प्रोबद्वारे यकृत आणि प्लीहा बिंदू शोधणे आणि मसाज करणे. हे ॲक्युप्रेशर दिवसातून २-३ वेळा एका मिनिटासाठी करा
- रात्री झोपण्यापूर्वी, दोन कोरडे हिरवे वाटाणे चिकट टेपवर लावा आणि यकृत आणि प्लीहाच्या उत्तेजित बिंदूंवर चिकटवा. (चित्र २ प्रमाणे)




**आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन (ISA) प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक :**
**१. ऑनलाईन सुजोक-बेसिक** Ki (Level-I) २९/११/२३ ते ८/१२/२०२३, **२. निवासी मेरिडियन-सुजोक** Ki (Level-II) २/१२/२३ ते ४/१२/२०२३, **३. ऑफलाइन सुजोक-बेसिक** (Level-I) ९/१२/२३ ते ११/१२/२०२३, **४. ऑनलाईन मेरिडियन सुजोक** Ki (Level-II) १८/१२/२०२३ ते २८/१२/२०२३, •Limited Seats Registration on First Cum First Basis.

**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**
M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times
**Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.**
**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**



सुनिता देसाई

# आरोग्य आणि मनोरंजन


## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला

**४ नोव्हेंबर २०२३ ते १० नोव्हेंबर २०२३**


*सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल ॲन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन ॲक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.*
**संपर्क : ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com**



**मेष** (अ, ल, इ)
वित्तविषयक निर्णय घेऊ शकणार नाही. आजूबाजूच्या कल्पनांमुळे तुम्ही गोंधळून जाल. **सल्ला:** ध्यान तुम्हाला मदत करेल. श्वासावर लक्ष केंद्रित करा. जास्त बोलू नका आणि काही काळ एकटे राहण्याचा प्रयत्न करा. तुमच्या शिल्लककडे लक्ष द्या.




**कर्क** (ड, च, ह)
तुम्ही जे प्रयत्न कराल ते तुम्हाला मिळेल. कोणीतरी तुमची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करेल. **सल्ला:** जे लोक खूप गोड बोलतात त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. समाधान तुम्हाला अधिक मिळवण्यास मदत करेल. तुमच्या ज्ञानाकडे लक्ष द्या.



**तुळ** (र, ट)
समाधान मनःशांती देईल आणि तुम्ही खूप छान काम कराल. **सल्ला:** तुमचे सामान तुमच्या प्रिय आणि जवळच्या लोकांसोबत शेअर करा. वाचन तुम्हाला मदत करेल म्हणून तुम्ही जे वाचता ते वाचून समजून घ्या. तुमच्या नफ्याकडे लक्ष द्या.



**मकर** (ख, ज)
तुम्ही स्वतःला अनेक बाबतीत सामर्थ्यवान समजाल आणि लोक तुम्हाला साथ देतील. **सल्ला:** तुमचे जुने कपडे गरजू लोकांना दान करा. गुलाबी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या लक्ष्याकडे लक्ष द्या.



**वृषभ** (ब, व, य)
खूप सकारात्मक विचार कराल परंतु कृती करताना तुमचा मत्सर तुम्हाला त्रास देईल. **सल्ला:** तुमच्या मानसिक अडथळ्यांपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करा.तुमच्या आजूबाजूच्या लोकांना निःस्वार्थपणे मदत करा. तुमच्या स्वाभिमानाकडे लक्ष द्या.



**सिंह** (म, ट)
कोणत्याही गोष्टीवर किंवा कोणावरही आनंदी होणार नाही. तुम्हाला बांधील वाटेल. **सल्ला:** एखाद्या पवित्र ठिकाणी किंवा मंदिराला भेट द्या. पक्षी किंवा प्राण्यांना खाऊ घालणे तुम्हाला मदत करेल.तुमच्या नवीन कल्पनांकडे लक्ष द्या.




**वृश्चिक** (न, य)
तुम्हाला जे हवे आहे ते तुम्हाला मिळेल आणि काही छुपे सत्य कोणीतरी उघड करेल. **सल्ला:** लोकांचे लक्षपूर्वक आणि स्पष्टपणे ऐका तुमचे काम स्वतः करा. कोणावरही विश्वास ठेवू नका. तुमच्या जबाबदाऱ्यांकडे लक्ष द्या.




**कुंभ** (ग, स, श)
तुम्ही बऱ्याच वेळा गोंधळात पडाल. यश आहे पण काही अतिरिक्त दबावासह. **सल्ला:** काही नवीन करण्यापूर्वी दोनदा विचार करा. लाल रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या प्रेमाकडे आणि काळजीकडे लक्ष द्या.




**मिथुन** (क, च, ज)
तुम्हाला तुमच्या कामात समाधान मिळेल आणि तुमच्या प्रयत्नांचे चांगले फळ मिळेल. **सल्ला:** तुमचा वेळ आणि शक्ती वाया घालवू नका. तुम्हाला भेटणाऱ्या लोकांना सुखसोयी देण्याचा प्रयत्न करा. तुमच्या बदलांकडे लक्ष द्या.



**कन्या** (प, ठ, ण)
भूतकाळातील चुका सुधारण्यासाठी पुरेसे मजबूत व्हाल आणि त्यामुळे तुम्हाला खूप मदत होईल. **सल्ला:** परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्याच्यावर विश्वास आहे त्याचा सल्ला घ्या. तुमच्या इच्छाशक्तीकडे लक्ष द्या.



**धनु** (भ, ड, फ, ट)
या आठवड्यात पैशात काही सुधारणा होईल आणि तुमचा दृष्टीकोन तुम्हाला मदत करेल. **सल्ला:** जेव्हा तुमच्या भावना नकारात्मक असतात तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवा. वस्तू पिवळ्या रंगात वापरा. तुमच्या कामाकडे लक्ष द्या.



**मीन** (द, च, झ)
मनःशांती आणि समाधान मिळविण्यासाठी तुम्हाला काही चांगले मार्ग सापडतील. **सल्ला:** वाद टाळा आणि लोकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न करा. गडद निळ्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या विश्वासाकडे लक्ष द्या.

# ठेकेदाराकडून खंडणी मागणाऱ्याला अटक

## न्यु.पी.एम.जी.पी. कॉलनीतील ट्रॅन्झीट कॅम्पच्या कामाबाबत खंडणी मागितल्याचा आरोप

■ **होम टाइम्स टीम**

**मुलुंडमधील एका ट्रँन्झीट कॅम्पचे तोडकाम करण्यात आल्यानंतर निघालेले लोखंड वाहून नेत असलेल्या प्रत्येक ट्रकसाठी आठ हजार रुपयांची मागणी करणाऱ्या माथाडी कामगाराला नवघर पोलिसांनी अटक केली आहे. सतीश गायकवाड असे अटक आरोपीचे नाव असून त्याने त्याचा भाऊ चंद्रसेन याच्या मदतीने कंत्राटदाराकडे खंडणीची मागणी केली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करुन ही कारवाई केली आहे.**

कुर्ल्यातील ७५ वर्षीय तक्रारदार व्यावसायिकाने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, ते मुलुंड पुर्वेकडील न्यु.पी.एम.जी.पी. कॉलनीमधील ट्रँन्झीट कॅम्पच्या इमारतीच्या तोडकामातून निघालेले लोखंड वाहून नेण्याचे काम करत होते. तेव्हा यातील आरोपी सतीश आणि चंद्रसेन या दोघांभावांनी त्यांच्याकडे प्रत्येक ट्रक मागे आठ हजार रुपयांची मागणी केली. आरोपींनी खंडणी वसुली करण्यासाठी आपली इनोव्हा कार येथील प्रवेशद्वाराच्या समोर उभी करुन वाहनांचा रस्ताही अडवला होता. १ ऑक्टोंबर ते २७ ऑक्टोंबर या दरम्यान हा प्रकार सुरु होता. या दोघांनी खंडणीची रक्कम न दिल्यास तक्रारदार आणि त्यांच्या सुपरवायझरला ठार मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मात्र तक्रारदार यांनी नवघर पोलीस ठाणे गाठून सतीश आणि चंद्रसेन विरोधात तक्रार दिली आहे.

# ऑनलाइन फसवणूक झालेले पैसे पोलिसांनी काही तासांत दिले मिळवून

## मुलुंड पोलिसांची स्तुत्य कामगिरी

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड पोलिसांच्या तत्परतेमुळे ऑनलाइन घोटाळ्यात गमावलेल्या २ लाख रुपयांपैकी ७५ टक्के रक्कम तक्रारदाराला परत मिळवून देण्यात यश आले. या कामगिरीमुळे पोलिसांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २८ वर्षीय साक्षी केडिया ही मुलुंडची रहिवासी आहे. काही दिवसांपूर्वी तिला क्रेडिट कार्डची लिमिट वाढवण्यासाठी ओटीपी पाठवून तिची २ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. या घटनेनंतर तिचे २ लाख रुपये दुसऱ्या व्यक्तीच्या एमपीएल खात्यात जमा झाल्याचे समजले. त्यानंतर तिने तात्काळ मुलुंड पोलिस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. पोलिसांनीही तात्काळ पाऊले उचलल्याने काही मिनिटांतच ही रक्कम गोठण्यात आली. परिणामी फसवणूक करणाऱ्या भामट्याला ती काढून घेता आली नाही. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पोलिसांनी २ लाखांपैकी १ लाख ५० हजार रुपये तक्रारदार साक्षीला परत केले. या कामगिरीबद्दल तक्रारदार साक्षी हिने मुलुंड पोलिसांचेही आभार व्यक्त केले आहेत. परिमंडळ ७चे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड, सहाय्यक पोलीस आयुक्त रवींद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली मुलुंड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांतीलाल कोथिंबीरे, मुलुंड सायबर सेलचे पोलीस उपनिरीक्षक शिवानंद आपुने, पोलीस उपनिरीक्षक अमोल बोरसे, पोलीस हवालदार उरणकर, पोलीस हवालदार कांगणे आणि महिला पोलीस हवालदार गायकर यांच्या तत्परतेमुळे तक्रारदाराला पैसे परत मिळाले.

# मुलुंडमध्ये विजेचा शॉक लागून सहा वर्षाच्या मुलाचा मृत्यू





■ **होम टाइम्स टीम**

घराबाहेर असलेल्या उघड्या विजेच्या तारेचा शॉक लागल्याने एका सहा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मुलुंड परिसरात घडली आहे. या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून उघड्या तारा ठेवणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरीकांनी केली आहे.

अर्णव निलेश भंडारे (वय ६) असे या मयत मुलाचे नाव असून तो मुलुंडच्या जयशास्त्रीशंकर नगर परिसरात राहत होता. रविवारी शाळेला सुट्टी असल्याने अर्णव दुपारी चारच्या सुमारास घराबाहेर खेळत होता. त्याच्या घराबाहेरच वीज कंपनीच्या काही उघड्या तारा होता. अर्णव खेळता-खेळता या ताराजवळ गेला. यावेळी यातील एका उघड्या तारेला त्याचा स्पर्श झाल्याने त्याला विजेचा जोरात धक्का लागला. यामध्ये तो गंभीर जखमी झाला होता.

घटनेच्या वेळी त्याची आजी आणि वडील घरात होते. त्यांच्या हा प्रकार लक्षात येताच त्याच्या वडिलांनी तत्काळ त्याला परिसरातील रुग्णालयात दाखल केले. मात्र याठिकाणी उपचार सुरू करण्यापूर्वीच मुलाचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर परिसरात संताप व्यक्त करण्यात येत असून याबाबत मुलुंड पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करत मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठवला आहे. दरम्यान या घटनेचा अधिक तपास मुलुंड पोलीस करत आहेत. या घटनेनंतर अद्यापही कोणावर सध्या तरी गुन्हा दाखल झालेला नाही. घटनेचा अधिक तपास करून अहवाल आल्यानंतर दोषींवर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

CALL CENTER
**022 66211333**

E-MAIL ID
**customerservice@homenet.net**

FACEBOOK MESSENGER
**HomeNet / @homenet.net**

**Facebook Messenger Scan Code:**
To get in touch, simply scan
a code using the Messenger app.

**HOME NET**
**www.homenet.net**

WOW! DOUBLE MAZZA!! uploads & downloads at same speed, since 2010 now @ ₹194/-*

Pay For 6 Months & Get Additional 7 Months Free — 6/7 OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED
99% UPTIME

- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

6/7 OFFER

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

**HOME FIBER** powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST**
For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

### HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps

** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS
INTRODUCTORY OFFER
IN YOUR SOCIETY
PLEASE COME TO US WITH
A MINIMUM GROUP OF
15 CONNECTIONS

SYMMETRIC SPEED · SUPER SPEED PACK UP TO 500MBPS · EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION · FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS · NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**
Download on the App Store · Get it on Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL
**Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839**
**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply


Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80.**Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**